२१-०७-२००५

# घराणेशाही

घराणेशाही भारतालाच काय परंतु, संपूर्ण जगाला नवीन नाही. काही शतकापुर्वी सर्वत्र राजाचा मुलगा राजा, शिक्षकाचा मुलगा शिक्षक, कुणब्याचा मुलगा कुणबी, सुताराचा मुलगा सुतार, चांभाराचा मुलगा चांभार वगैरेच होत असे. भारतामध्ये काल परवा पर्यंत हीच स्थिती होती व अजुनही मोठ्या प्रमाणात आहे. ह्याचे मुख्य कारण मनुष्याचे राहण्याचे व काम करण्याचे ठिकाण एकच असे. त्याला थोडे अपवाद आहेत, जसे सैनिक, कुणबी वगैरे. हे अपवाद पूर्णपणे नाहीत. सैनिक घरी अभ्यास करत, कुणबी शेतात घर बांधून राहत. चोराचिलटांच्या भीतीपोटी गांवातही राहत.

राहण्याचे व कामाचे ठिकाण एकच असल्यामुळे मुलांचे शिक्षण पाळण्यात असल्यापासून सुरू होई. वैद्याचा मुलगा (किंवा मुलगी) चालायला शिकायच्या आधी पुड्या बांधावयास शिकत असे. नाक साफ करावयास शिकण्या आधी नाडी परीक्षा शिकत असे. अशा प्रशिक्षणा नंतर मूल वैद्य झाले तर त्यात आश्चर्य कसले? त्या बद्दल आक्षेप घेण्याचे कारण काय? पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरु यानी इंदिरा गांधींचे असेच प्रशिक्षण केले. घरात असताना व तुरुंगात असतानाही. नेहरुजींनी इंदिराजींना कित्येक पत्रे लिहली, त्यांचे कडून लोकोपयोगी कामे करून घेतली, स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यात प्रोत्साहित केले. त्या मुळेच इंदिराजी लोक नेत्या बनू शकल्या. त्या मुळेच पंतप्रधान होण्याचा त्याना हक्क प्राप्त झाला.

ज्या अर्थाने 'घराणेशाही' हा शब्द सध्या प्रचलित आहे त्या अर्थाने इंदिराजींना पंतप्रधानपद घराणेशाही मुळे अजिबात मिळाले नाही. राजीव गांधींच्या बाबत असे म्हणता येईल. राजीवजी पूर्णपणे सद्गृहस्थ होते, त्यांचे मागे भक्कम जनाधार होता. परंतु त्याना ना देशोन्नतीचा मार्ग माहीत होता, ना देशा पुढील प्रश्नांची जाण होती, ना राजकारणात गती होती. या मुळेच त्याना पदाचा पूर्णपणे काय थोडाही उपयोग करून घेता आला नाही. परंतु, त्यानी दुरुपयोग सुद्धा केला नाही. विमान चालवताना लोकानी त्याना देश चालवण्या करता ओढून आणले. कांही जनाधार नसलेल्या परंतु महत्त्वाकांक्षी असलेल्या राजकारण्यांच्या स्वार्थाकरता राजीवजींना बळीचा बकरा बनावे लागले. ७५% पेक्षा जास्त खासदार असुनही शहाबानो प्रकरणात हार पत्करावी लागली. पक्षांतर थांबवता आले नाही. त्या वेळी त्यानी विचारपूर्वक पक्षाध्यक्षपद स्वीकारून योग्य व्यक्तीला पंतप्रधान केले असते तर त्याना किती तरी उच्च मानाचे स्थान प्राप्त झाले असते. खुषमस्कऱ्यांच्या घोळक्यात सापडल्या मुळे सद्गृहस्थाचे कसे वाटोळे होते त्याचे राजीवजी हे न विसरण्या सारखे उदाहरण आहे.

सोनिया गांधींना कांही शक्तींच्या दबावामुळे कां होईना शहाणपण सुचले. त्यानी स्वतःच्या महत्त्वाकांक्षेला मुरड घातली व मनमोहनसिंगा सारखा पारंगत पंतप्रधान दिला. मनमोहनसिंगांची प्रतिमा स्वच्छ आहे, निस्वार्थी आहेत, सामाजिक न्यायाची त्याना उत्तम जाणीव आहे, लोकप्रिय आहेत, देशाची उन्नती कशा प्रकारे होईल या बद्दल त्यांचे विचार परिपक्व आहेत, देशाची उन्नती करण्याचे मार्ग त्याना माहित आहेत, त्या मार्गाने चालण्याची क्षमता राखतात, प्रशासनाची जाण आहे परंतु, लोकशाही मध्ये मतपेटी भरल्या शिवाय व्यक्तिगत गुणांचा उपयोग देशाकरता करता येत नाही. मतपेटी भरण्याचे क्षमता सोनियांच्या कडे पुरेशी आहे. सोनियां जन्मल्या वाढल्या जॅकलीन केनेडीच्या संस्कृतीत. परंतु त्यानी त्या संस्कृतीशी पूर्णपणे फारकत घेतली व भारतीय संस्कृती अंगीकारली. सामाजिक न्याया बद्दल त्याना आस्था असल्यामुळे, भारतीय तत्त्वज्ञानावर त्यांची पूर्ण निष्ठा असल्यामुळे, भारतीयता पूर्णपणे अंगीकारल्यामुळे त्याना पंतप्रधान पदाच्या इच्छेवर विजय मिळवता आला. भारत देश त्या बद्दल ऋणी राहील. त्यांच्या बद्दलचे हे मत अबाधित राहण्या करता त्यानी त्याच्या स्वतःच्या मुलानी आपली योग्यता सिद्ध केल्या शिवाय कोठल्याही आसनावर बसवू नये. देशप्रेम मातृप्रेमा पुढे फिके पडू देऊ नये. जनाधार नसलेल्या परंतु महत्त्वाकांक्षी, स्वार्थी राजकारण्यांची कमतरता त्यांच्या पक्षात आजही नाही व उद्याही असणार नाही. खंबीर पणे अशा राजकारण्याला नाही म्हणणेच देशहिताचे आहे.

पाटलाचा पोर पाटलाबरोबर चावडीत बसून बाप काय करतो हे जाणीवपुर्वक समजून घेतो, बापाबरोबर शेतात, रानावनात फिरतो, बाप शेतकऱ्या बरोबर कसे बोलतो, बाप प्रश्न कसे समजून घेतो, उपाय कसे शोधतो याचे आकलन

करून घेतो. असा पोर पुढे पाटील बनण्यास लायक होऊ शकतो. परंतु, जर तो पोर टवाळक्या करत फिरला, पोरीबाळीच्या खोड्या करण्यात वेळ घालवत असेल तर तो पुढे केवळ बाप पाटील होता म्हणून हा पण पाटील हे कोठल्या तर्कशास्त्रात बसते? वडील माणसानी प्रबोधन केले (किंवा करण्याचा प्रयत्न केला) एवढेच पुरेसे नाही. मुलाने प्राविण्य संपादन करणे हे किंबहुना जास्त महत्त्वाचे आहे.

शिवाजी महाराज, टिपू सुलतान, मोगल राजपुत्र या सर्वांचे प्रशिक्षण त्यांच्या पालकानी केले व ज्यानी त्याचा उपयोग करून घेतला ते उत्तम राजे/सुलतान/बादशहा झाले. शिवाजी महाराज हे एकमेवाद्वितीय उदाहरण आहे. असे संभाजी महाराजा बद्दल दुर्दैवाने म्हणता येत नाही. संभाजी महाराजानी आयुष्याच्या शेवटी शिवाजी महाराजांची शिकवण योग्य वेळी आचरणात आणली व स्वराज्य वाचवले. धर्मांतरा ऐवजी मृत्यूला कवटाळले. त्यातुनच सर्व जनता एकत्र आली व स्वराज्य मोठमोठ्या संकटातून तरून निघाले. संभाजी महाराजाना दादोजी कोंडदेवा सारखे गुरू व जिजामाता सारखी आई मिळाली असती तर बापा पेक्षा बेटा सवाई निघाला असता.

घराणेशाही चांगल्या अर्थाने टिकवण्या करता बाप व मुलगा दोन्हीही जबाबदार आहेत. दोघानीही आपली कर्तव्ये जबाबदारी पूर्वक पार पाडली तर घराणेशाहीत लोकांचे हित आहे व त्याला नाक मुरडण्याचे कारण नाही.

सांप्रत काळातील कर्तृत्ववान राजकारण्यांची मुले कितपत योग्य आहेत? हे स्वतः त्या त्या राजकारण्यानी तपासून पहावे. त्यांच्या पदरी निराशाच येईल. बाळासाहेबाना वडीला कडून प्रबोधनाचा वारसा मिळाला. त्यानी उत्तम प्रकारे आत्मसात केला. ठाम पणे विचार मांडणारा समाजसेवक व राजकारणी त्यांच्या सारखा विरळाच. शून्यातून पक्ष उभारला. मराठी मनाचा अविभाज्य भाग बनवला. मराठी माणसाला आत्मविश्वास मिळवून दिला. नांवारूपास आणला. बाळासाहेबांचे कर्तृत्व त्यांच्या मुलामध्ये असेलच असे खात्री पूर्वक सांगता येणार नाही. त्या करता त्यांची परीक्षा घेतलीच पाहिजे. पूर्वी राजे लोक राजपुत्रांची परीक्षा घेत असत. मोंगल सम्राट मुलाना सुभेदारी देत असत. तेथील त्यांच्या कर्तबगारीवरून त्यांची योग्यता तपासून पहात. बाळासाहेबाना असेंच करावे लागेल. त्यातून योग्यता अजमाऊन निर्णय घ्यावा लागेल. बाळासाहेबांच्या पदाचे जे कोणी इच्छुक आहेत त्या सर्वानाच ही परीक्षा द्यावी लागेल. त्या मध्ये जो उत्तीर्ण होईल व अव्वल येईल तोच बाळासाहेबांचा खरा वारसदार होऊ शकेल. बाळासाहेबांच्या पश्चातही पक्ष तरून जाईल.

मुंबई, कोंकण व मराठवाडा विभागात पक्षाचे बळ लक्षणीय आहे. परंतु, ती स्थिती मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व विदर्भात नाही. सर्व इच्छुकाना या विभागात पाठवावे. पक्ष बांधण्यास सांगावे. जो या परीक्षेत उत्तीर्ण होईल त्याला उत्तराधिकारी नेमण्याची गरजच भासणार नाही. झाडून सारे सैनिक आपणहून त्याला बाळासाहेबांचा उत्तराधिकारी म्हणून स्वीकारतील.

बाळासाहेबानी स्वतः वर स्वतःच निर्बंध घातले. स्वतः करता नियम बनवले. आणि हे सर्व एखाद्या योग्या प्रमाणे व्रतःस्थ राहिले. आपले विचार नेहमीच स्पष्ट पणे मांडले. कोणाला आवडो अगर न आवडो. त्यानी त्याची कधीच पर्वा केली नाही व भविष्यातही करणार नाहीत. शासना मध्ये कोठलेही पद स्वीकारले नाही व स्वीकारणारही नाहीत. आणि असेच किती तरी. त्यांच्या आज वरच्या विजयाचे मर्म त्यानी अंगीकारलेल्या या बंधनात आहे. बहुतेक काय किंबहुना, खात्री पूर्वक सोनियाना पंतप्रधानपद सोडण्याची प्रेरणा बाळासाहेबाकडूनच मिळावी असावी. बाळासाहेबांचा वारसही तसाच असावा. पक्षाच्या अध्यक्षाने शासना मध्ये काठलेही पद सांभाळू नये. हा नियम सर्वच पक्षानी पाळण्यात राष्ट्राचे हित आहे.

घराणेशाहीला आक्षेप नसावा. एवढेच पाहिले पाहिजे की, केवळ वारसा हक्काने पद प्राप्त होऊ नये. पदा करता सर्वानाच कठोर परिक्षा असावी. त्या मध्ये वारसा हक्क सांगणारानेही भाग घ्यावा. या परीक्षेत जो उत्तीर्ण होईल व प्रथम क्रमांक मिळवील त्यालाच ते पद प्राप्त व्हावे.